And whereas, it is noticed by the State Government that such discontinuation of production of thin gague polyethylene (plastic) bags has not achieved the expected result ;

And whereas, the Government of Maharashtra is of the opinion that, the use of polyethylene (plastic) carry bags is causing grave injury and is deterimental to the environment and the health of human beings as well as animals ;

And whereas it is observed that the plastic bags and ancillary products are grossly responsible for blockage of gutters, sewers and drains, resulting in serious environmental problems ;

And whereas, with a view to prevent the occurrence of such problem the Government has decided to declare the entire area of the State of Maharashtra as " the Plastic Bag Free Area ";

Now, therefore, in exercise of the powers conferred by section 5 of the Environment (Protection) Act, 1986 (29 of 1986), delegated to the Government of Maharashtra by the Government of India, Ministry of Environment and Forests (Department of Environment, Forests and Wildlife), by it's Notification No. S.O. 488 (E), dated 17th May 1988, issued under section 23 of the said act, read with rule 4 of the Environment (Protection) Rules, 1986, the Government of Maharashtra hereby, directs that,—

(*i*) Every trader (including hawker), shopkeeper, wholesaler or retailer or any other person shall discontinue the use of polyethylene (plastic) bags, for packing, handling, storing, carrying or for any other purpose ;

(*ii*) (*a*) The Municipal Commissioners of the Municipal Corporations and the Chief Officers of the Municipal Councils, within their respective areas ; and

(*b*) The Collector of Districts, for areas other than those specified in clause (*a*) above ;

shall ensure the compliance of the directions at (*i*) above.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

B. P. PANDEY,
Principal Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ६७ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

मंगळवार, सप्टेंबर १३, २००५/भाद्र २२, शके १९२७

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-अ

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**पर्यावरण विभाग**

१५ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग, मंत्रालयासमोर,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १३ सप्टेंबर २००५

**आदेश**

**पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६.**

क्रमांक प्लास्टीक. २००५/प्र. क्र. ३८/तां. क.-३.—भारत सरकारच्या पर्यावरण व वन मंत्रालयाने (पर्यावरण, वन व वन्यजीव विभाग) पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ (१९८६ चा २९) याच्या कलम २३ व पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ याच्या नियम ४ या अन्वये काढलेली अधिसूचना क्रमांक एस. ओ. ४८८ (ई), दिनांक १७ मे १९८८ द्वारे महाराष्ट्र शासनाला सोपविलेल्या व उक्त अधिनियमाच्या कलम ५ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने काढण्याचे योजलेल्या आदेशाचा पुढील मसुदा, त्यामुळे बाधा पोहोचण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीकरिता, याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे ; आणि याद्वारे अशी सूचना देण्यात येत आहे की, उक्त मसुदा, महाराष्ट्र शासन, हा आदेश महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर विचारात घेईल.

२. उपरोक्त कालावधीत, उक्त मसुद्याच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही सूचना किंवा आक्षेप, प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, यांच्याकडे येतील, त्यावर शासन विचार करील.



[किंमत : रुपये ७.००]

## आदेशाचा मसुदा

क्रमांक प्लास्टीक. २००५/प्र. क्र. ३८/तां. क ३.—ज्याअर्थी, पॉलिथिलीन (प्लास्टीक) पिशव्या ह्या पर्यावरणास व आरोग्यास अल्पकालिक व दीर्घकालिक धोका असलेले एक संभाव्य संकट बनले आहे ;

आणि ज्याअर्थी, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ४८अ मध्ये राज्याने, पर्यावरणाचे संरक्षण व त्यात सुधारणा करण्यासाठी आटोकाट प्रयत्न करणे हा मुद्दा दृष्टीसमोर ठेवण्यात आला आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, शासन आदेश, पर्यावरण विभाग, क्रमांक इएनव्ही. १०९८/८९९/सी.आर.४३/टी.सी. ३, दिनांक ८ मार्च १९९९ व शासन निर्णय, पर्यावरण विभाग, क्रमांक प्लास्टीक. २०००/सी.आर. २३/टी.सी. ३, दिनांक १० ऑगस्ट २००० त्याद्वारे नवीन पॉलिथिलीन (प्लास्टीक) पिशव्यांसाठी २० मायक्रॉनपेक्षा कमी व पुन्हा वापरात आणण्याजोग्या पिशव्यांसाठी (Recycled bags) २५ मायक्रॉनपेक्षा कमी जाडी असलेल्या पातळ पॉलिथिलीन (प्लास्टीक) पिशव्यांचे उत्पादन बंद करण्यासाठी तरतूद केली आहे ;

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, कमी जाडी असलेल्या पातळ पॉलिथिलीन (प्लास्टीक) पिशव्यांच्या उत्पादनावरील अशा बंदीमुळे अपेक्षित परिणाम साध्य झालेला नाही ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाचे असे मत झाले आहे की, पॉलिथिलीन (प्लास्टीक) पिशव्यांच्या वापरामुळे गंभीर धोका निर्माण झाला असून त्या, पर्यावरणास व मानवाच्या तसेच, प्राण्यांच्या आरोग्यास अपायकारक आहेत ;

आणि ज्याअर्थी, असे निदर्शनास आले आहे की, गटारे, मलप्रवाह, नाले तुंबण्यास प्रामुख्याने प्लास्टीकच्या पिशव्या व अनुषंगिक उत्पादने कारणीभूत असून त्यामुळे पर्यावरणाची गंभीर समस्या निर्माण होत आहे ;

आणि ज्याअर्थी, अशी समस्या निर्माण होऊ नये म्हणून, शासनाने संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे क्षेत्र हे " प्लास्टीक पिशव्या मुक्त क्षेत्र " म्हणून घोषित करण्याचे ठरविले आहे ;

त्याअर्थी, आता, भारत सरकार, पर्यावरण व वन मंत्रालय (पर्यावरण, वने व वन्यजीव विभाग) यांनी उक्त अधिनियमाच्या कलम २३ व पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ याच्या नियम ४ याअन्वये काढलेली अधिसूचना क्रमांक एस. ओ. ४८८ (ई), दिनांक १७ मे १९८८ द्वारे महाराष्ट्र शासनास सोपविलेल्या व पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ (१९८६ चा २९) याच्या कलम ५ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे असे निदेश देत आहे की,—

(एक) प्रत्येक व्यापारी (फेरीवाल्यासहित), दुकानदार, घाऊक व किरकोळ विक्रेते, किंवा इतर कोणतीही व्यक्ती, आवेष्टन करणे, हाताळणे, साठा करणे, वाहून नेणे यासाठी किंवा इतर कोणत्याही प्रयोजनासाठी पॉलिथिलीन (प्लास्टीक) पिशव्यांचा वापर करणार नाही ;

(दोन) (क) महानगरपालिका क्षेत्रामध्ये महानगरपालिका आयुक्त व नगरपरिषद हद्दीत नगरपरिषदांचे मुख्याधिकारी,

(ख) वरील खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्राव्यतिरिक्त इतर क्षेत्रासाठी जिल्ह्याचे जिल्हाधिकारी,

हे उक्त (एक) वरील निदेशांचे अनुपालन होत असल्याची खात्री करतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**भू. प्र. पाण्डेय,**
शासनाचे प्रधान सचिव.



## ENVIRONMENT DEPARTMENT

15th floor, New Administrative Building,
Madam Kama Road, Mantralaya, Mumbai 400 032,
dated the 13th September 2005

### Order

ENVIRONMENT (PROTECTION) ACT, 1986.

No. Plastic. 2005/CR-38/T.C.III.—The following draft of order which Government of Maharashtra proposes to issue, in exercise of the powers conferred by section 5 of the Environment (Protection) Act, 1986 (29 of 1986), delegated to Government of Maharashtra by the Government of India, Ministry of Environment and Forests (Department of Environment, Forests and Wildlife), by it's Notification No. S.O. 488 (E), dated 17th May 1988, issued under section 23 of the said Act, read with rule 4 of the Environment (Protection) Rules, 1986, is hereby published for information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra after expiry of a period of thirty days from the date of publication of this Order in the *Maharashtra Government Gazette.*

2. Any objection or suggestion which may be received by the Principal Secretary to Government, Environment Department, Mantralaya, Mumbai 400 032, from any person with respect to the said draft, within the said period will be considered by Government.

### *DRAFT ORDER*

No. Plastic. 2005/CR-38/T.C.III.—Whereas, polyethylene (plastic) bags have become a potential menace having short term and long term environmental risks and health hazard ;

And whereas, article 48A of the Constitution of India, *inter alia,* envisages that the State shall endeavour to protect and improve the environment ;

And whereas, *vide* Government Order, Environment Department, No. Env-1098/899/C.R.43/T.C.III, dated the 8th March 1999, and *vide* Government Resolution, Environment Department No. Plastic-2000/CR. 23/T.C. III, dated 10th August, 2000 the Govenment of Maharashtra has provided for discontinuance of the production of thin gauge polyethylene (plastic) carry bags, having thickness, less than 20 micron for new virgin bags and less than 25 micron for recycled bags ;